ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# महात्मा गांधीजींचे सत्याग्रह संबंधीचे विचार

**प्रा. विजया अशोक कोळेकर**
राज्यशास्त्र विभाग,
न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर

★★★

**गोशवारा** – महात्मा मोहनदास करमचंद गांधी यांचे स्थान भारतातच नव्हे तर जगात अद्वितीय आहे. महात्मा गांधी आदर्शवादी व युग प्रवर्तक नेते होते. ते प्रामुख्याने आदर्शवादी व मानवतावादी विचारवंत म्हणून ओळखले जातात. धर्म आणि राजकारण यांचा सुंदर समन्वय साधून त्यांनी राजकारणाला व्यवहारिक असे नवी अध्यात्मवादी दृष्टी दिली. मानवता हा त्यांचा केंद्रबिंदू असून मानव मुळातच चांगला असतो यावर त्यांची श्रद्धा होती. साध्य आणि साधन सूचिता हा त्यांच्या विचारांचा गाभा असून अन्यायाचा प्रतिकार सत्य, अहिंसा व सत्याग्रहाच्या मार्गाने करता येतो हे त्यांनी जगाला आपल्या विचारातून व कृतीतून दाखवून दिले. महात्मा गांधी राजकीय सिद्धांती नव्हते तरीही त्यांनी राज्यशास्त्रीय विचारात महत्त्वाची भर घातली.

**प्रस्तावना** – महात्मा गांधी 1915 मध्ये भारतात परत आल्यानंतर त्यांनी स्वदेशी जागृतीच्या कार्यास सुरुवात केली. त्यांच्या कार्यावरुनच भारतीय जनतेने त्यांना 'महात्मा' ही पदवी दिली. बिहारमधील चंपारण्यातील शेतकऱ्यांवर होणारा जुलूम दूर करण्याच्या दृष्टीने त्यांनी प्रथम चळवळ सुरू केली. त्यानंतर गुजरातमधील खेडा जिल्ह्यात साराबंदीची चळवळ हाती घेतली. अल्पावधीत महात्मा गांधीजीनी मिळविलेल्या यशामुळे व त्यांच्या अभिनव मार्गाने त्यांनी सर्व देशाचे लक्ष वेधून घेतले.

सन 1921 पासून देशाच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने कार्य करण्यात म. गांधीजींनी खऱ्या अर्थाने सुरुवात केली. 1921 ते 1947 या काळात त्यांनी देशात स्वातंत्र्याला पोषक असे वातावरण निर्माण केले. असहयोग सविनय कायदेभंग, विदेशी वस्तूंवर बहिष्कार, भूमी कर न देणे, सत्याग्रह इ. मार्गांनी त्यांनी सरकारला तर जेरीस आणलेच पण त्याचवेळी जनतेत ही स्वातंत्र्यासंबधी जागृती निर्माण केली. द्वितीय महायुद्धाच्या वेळी भारतीयांच्या इच्छेविरुद्ध हिंदुस्तान युद्धात सामील असल्याचे इंग्रज सरकारने जाहीर केले. याच्या निशेधार्थ कॉंग्रेसी मंत्रिमंडळांनी राजीनामा दिला आणि कॉंग्रेसने म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह सन 1940 साली चालवला.

**महात्मा गांधीजींचे सत्याग्रहा संबंधी विचार** – सत्याग्रह ही म. गांधीजींनी या देशाला दिलेली एक मत्वपूर्ण अशी राजकीय देणगी होय. त्यांच्या तत्वज्ञानात सत्याग्रहाला अतिशय महत्वाचे स्थान आहे. असे म्हटले जाते की, सत्याग्रहाची कल्पना म्हणजे राजकीय विचार आणि व्यवहार यांचा अपूर्व मिलाफ होय. ही सत्याग्रहाची कल्पना गांधीजींना दक्षिण आफ्रिकेत सूचली. सत्यासाठी धरणे आयोजित करणे म्हणजे सत्याग्रह होय. सत्याग्रहाचा अवलंब करतांना प्रतिपक्षावर आपण हिंसेचा किंवा बळाचा वापर करु शकत नाही. सत्याग्रह पद्धतीमध्ये देऊन ते करता येत नाही. तर स्वतःच्या यातना भोगून प्रतिपक्षाचे मन, अंतकरण त्या दृष्टीने बदलावे लागते आणि त्यामध्ये सत्याला टिकवून ठेवावे लागते.

**सत्याग्रहाचा अर्थ** –''सत्याग्रह म्हणजे युद्ध आत्मिक शक्तीचा अन्याय, दडपशाही आणि शोषण या विरुद्ध केलेला वापर. आत्मविश्वास आणि आत्मकष्ट हे आत्मशक्तीचे दोन गुण आहेत. सत्याग्रहाच्या मार्गाने विरोधकांच्या ह्रदयात परिवर्तन होतेच. सत्याग्रहाचा विचार, उद्देश, विरोधकांना इजा पोहोचविण्याचा नसून त्यांचे अज्ञान दूर करण्याच्या असतो.''

**सत्याग्रहाची व्याख्या** – अन्याय, जुलूम आणि हिंसा या विरुद्ध अहिंसा आणि न्याय मार्गाने दिलेला लढा म्हणजे सत्याग्रह होय.

**सत्याग्रहाचे स्वरूप** – मानवी संस्कृतीच्या विकासातील महात्मा गांधीचे सर्वात महत्त्वाचे योगदान म्हणजे त्यांचे सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान होय. वास्तविक सत्य आणि अहिंसा ही तत्वे नवीन नाहीत. प्राचीन काळापासून अनेक प्रेशितांनी आणि तत्व वेत्यांनी त्याचा आग्रह ध ारलेला आहे. गौतम बुद्ध आणि महावीर यांनी मानवाला, अहिंसा आणि प्रेम यांची शिकवण दिली. येशू ख्रिस्ताने ही जगाला दया आणि प्रेम यांची शिकवण दिली. तेव्हा सत्य किंवा अहिंसा यांचे तत्त्वज्ञान जगाला नवे नाही. म. गांधीजींच्या विचारातील वेगळेपणा यामध्ये आहे की, सत्याग्रह आणि अहिंसा या जुन्या तत्वांचा वापर त्यांनी अन्याय आणि जुलूम या विरुध्द लढण्याचा मार्ग बनलेला आहे. सत्याग्रहाची कृती ही सत्य, प्रेम, आणि अहिंसा या सनातन, आणि अहिंसा या सनातन तत्वांना गांधीजींनी अन्याया विरुद्ध लढण्याचे साधन बनविले. त्यांना एक नवा आयशय प्राप्त करून दिला. सत्याग्रहाची कल्पना अधिक स्पष्ट करण्यासाठी 'सत्य' या शब्दाचा अर्थ सर्वसाधारणपणे जो अर्थ घेतला जातो. त्याहून अधिक व्यापक आणि सखोल अर्थाने गांधीजींनी तो शब्द वापरला आहे. सत्य हे म. गांधीजींच्या दृष्टीने सर्वोच्च नैतीक मूल्य होते. ते जीवनाचे अंतिम उद्दिष्ट होते. मानवी जीवनाच्या अस्तित्वाचाच तो आधार होता. म्हणून त्यांनी सत्यालाच ईश्वर मानले आहे.

**सत्याग्रहाचेआधार – 1) प्रेम आणि आत्मक्लेश** – महात्मा गांधीजींच्या मते, सत्य हे मूलभूत तत्त्व मानले तर, प्रेम हे सत्य शोधण्याचे साधन मानावे लागेल. प्रत्येक मानवामध्ये ईश्वराचा अंश

ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

असतो, आणि प्रेमाच्या,आत्मक्लेशाच्या साह्याने शत्रूला ही जिंकू अशी सत्याग्रहींच्या मनात खात्री असते. क्लेश ही अशी गोष्ट असते की, जे इतरावर क्लेश लादतात, इतरांना क्लेश देतात. त्यांचे नैतिक सामर्थ्य घटते. सत्याग्रही हिंसे ऐवजी आत्मक्लेशाचा मार्ग पसंत करतात. अहिंसा आत्मक्लेशाला प्राधान्य देते आणि अहिंसेच्या साह्याने कठीणातल्या कठीण हृदयाचे ही परिवर्तन घडवून आणता येते. अशी सत्याग्रहीची धारणा असते. सक्ती ऐवजी प्रेमाने आणि अनुनयाने आणि लोकांना जिंकता येईल, अशी महात्मा गांधीजींना खात्री होती.

**2) आत्मशुद्धी** – सत्याग्रहीला प्रेमाबरोबर आत्मशक्ती आणि अंतःशुद्धी यावर भर द्यावा लागतो. सत्याग्रहीने स्वतःहाचे चरित्र शुद्ध ठेवावे. सत्याचा पाठपुरावा करावा, आणि निर्भय राहावे, शुद्धता आणि स्वयंशिस्त असल्याशिवाय सत्याग्रहीला सामर्थ्य प्राप्त करता येत नाही. ब्रह्मचर्य हा महात्मा गांधींनी आत्मशुद्धीचा मार्ग मानला असला तरी सर्वांसाठी त्याचा आग्रह धरलेला नाही.

**3) उपोशण** – म. गांधीजींच्या अहिंसेमध्ये उपोषणालाही महत्त्वाचे स्थान आहे. उपोषण हे व्यक्तिगत शुद्धीचे साधन आहे, तर राष्ट्रीय संघर्शात राष्ट्रीय पश्चातापाचे हत्यार आहे. महात्मा गांधी म्हणतात की, खरे उपोषण माणसाचे शरिर, मन आणि आत्मा शुद्ध करते. ते शरीराला क्लेश देते. परंतु आत्म्याला शुद्ध करते 'उपोषण ही एक उपासनाच आहे.'

**4) निर्भयता** –शुद्धी आणि उपोषणा इतकीच सत्याग्रहीला निर्भयतेची आवश्यकता असते अहिंसेचे निर्भय पालन करावयाचे असेल तर सत्याग्रहीच्या मनात भीतीचा लवलेशही राहता कामा नये. स्वार्था पोटी भय किंवा भीती निर्माण होते. सत्याग्रही पूर्णतः आणि निस्वार्थी असल्याशिवाय तो निर्भय राहू शकणार नाही. माणूस जेव्हा स्वतःचा विचार करीत नाही. त्यावेळी तो खऱ्या अर्थाने सत्याग्रही बनतो.

**5) अपरिग्रह** – निर्भय बनण्यासाठी अपरिग्रहाची आवश्यकता असते. माणसाने भौतिक सुखापासून अलिप्त राहण्याची प्रवृत्ती ठेवली पाहिजे. माणूस भौतिक सुखाच्या मागे लागला की, तो स्वार्थी बनू लागतो. स्पर्धा सुरु होते, आणि भौतिक लालसेला अंत नसल्याने ती स्पर्धा संपत नाही. अशा स्पर्धेत हिंसा आणि दुष्टता अपरिहार्य असते. म्हणून माणसाने भौतीक गरजापासून दूर राहिले पाहिजे.

**6) निर्धार** – निर्धाराशिवाय कोणताही सत्याग्रही यशस्वी होत नाही. सत्याग्रह किती लोक करतात. यापेक्षा त्यांचा हेतू काय आहे, सत्याग्रहीच आवश्यक गुण त्यांच्यात कितपत आहेत, त्यांचा निर्धार कसा आहे. यावर सत्याग्रहीचे यश अवलंबून असते. सत्याचा आग्रह करणारा खरा सत्याग्रही असतो.

**सत्याग्रहाची मूलतत्वे** –

1) सत्याग्रहाचा हा लढा मूळतः आत्मिक बळावर लढाईचा लढा आहे. या लढ्यामध्ये इतर कोणत्याही सामर्थ्यापेक्षा आत्मिक सामर्थ्य महत्त्वाचे आहे.

2) सत्याग्रह हा अन्याय, जुलूम करणाऱ्याचे हृदय परिवर्तन करण्याचा मार्ग आहे. यासाठी सत्याग्रह करणाऱ्यांनी स्वतःक्लेश करून दुसऱ्याच्या प्रवृत्तीमध्ये परिवर्तन घडवून आणले पाहिजे. दुसऱ्याला क्लेश देऊ नये.

3) सत्याग्रहामध्ये शारीरिक बळाचा कोणत्याही प्रकारे हिंसक मार्गाचा वापर करणे वर्ज्य आहे.

4) चांगले साध्य करण्यासाठी साधने सुद्धा चांगली पाहिजेत. जशी साधने असतील तसे साध्य प्राप्त होईल. म्हणून सत्याग्रहाची प्राप्ती सुद्धा केवळ अहिंसेच्या मार्गानेच होऊ शकेल.

**सत्याग्रही करिता पात्रता**

1. सत्याग्रहाची परमेश्वरावर आढळ निष्ठा, श्रद्धा असावी. अशी श्रद्धा असल्याशिवाय त्याला विरोधकांकडून जे शारीरिक त्रास देण्यात येईल तो यास सहन करू शकणार नाही.
2. सत्याग्रहीला संपत्तीची आणि प्रसिद्धीची हाव नसावी.
3. सत्याग्रहीचे शरीर स्वास्थ्य उत्तम असावे त्या करिता त्याने व्यायाम करावा.
4. सत्याग्रहीने ब्रह्मचर्याचे पालन करावे.
5. क्रोध, घृणा इत्यादी भावनांच्या आहारी जाऊन आपल्या मार्गापासून विचलित होणारा नसावा.
6. विरोधका संबंधी प्रेम आणि आदराची भावना ठेवणारा असावा.

**सत्याग्रहाची साधने**

**1) हिजरत** –जेव्हा एखाद्या ठिकाणी व्यक्तींवर, जनतेवर सतत अत्याचार होत असतील, सतत त्यांचा मान भंग होणार असेल, आणि अहिंसात्मक मार्गाने त्याचा प्रतिकार अशक्य झाला असेल, तर अशा वेळी जनतेने तो प्रदेश सोडावा. आपल्या रक्षणासाठी त्यांना हिंसात्मक मार्गाचा अवलंब करावा लागला तर त्यांनी ते स्थान सोडून द्यावे ह्यामध्ये सत्याग्रही किंवा अन्य व्यक्ती आपल्या पूर्व स्थानांवर आत्मसन्मानाने राहू शकत नाही म्हणून हिजरतचा उपयोग केला जातो.

**2) उपोषण** –सत्याग्रहासाठी उपोषणाचा मार्ग उत्तम आहे असे म. गांधीजी म्हणत, त्यांचा 21 दिवसांचा उपवास जगप्रसिद्ध आहे. उपोषण स्वतःच्या तसेच इतरांच्या शुद्धीसाठी आवश्यक आहे. स्वार्थासाठी जर उपवास केला, तर मात्र त्यापासून यश प्राप्ती होत नाही.

उपोषणाच्या मार्गाचा अवलंब इतर चांगल्या मार्गाप्रमाणेच कशाचीही आशा न करता करावा. उपोषणामुळे उपोषण करणाऱ्याला जरी कष्ट होत असले तरी त्यामुळे कठोर हृदयाच्या विरोधकाचे सुद्धा हृदयपरिवर्तन घडून येते.

**3) हरताळ** – हरताळ म्हणजे कामकाजावर बहिष्कार टाकणे होय. कामकाज बंद करून ठेवले की, प्रतिपक्ष वठणीवर, योग्य रस्त्यावर येऊ लागतो. विद्यार्थी, शिक्षक व व्यापारी इ. थरातील सर्वच लोकांनी विशिष्ट वेळी कामकाज ठप्प करून असहकार पुकारावा असे झाले की, अन्याय होत आहेत हे सर्वाच्या लक्षात येते. लोकांमध्ये हळूहळू जागृती होत असते. प्रतीपक्षास त्यामुळे जाग येते. त्यामुळे जनतेची होणारी पिळवणूक, आणि षोशण आपोआप थांबते. हरताळामध्ये हिंसा घडत नाही. अराजक निर्माण होत नाही. त्यामुळे प्रतिपक्षावर एक मोठा दबाव येतो. त्यामुळे हरताळ या साधनाला खऱ्या अर्थाने पूर्ण नैतिक असे स्वरुप आहे.

**4) बहिष्कार** – बहिष्कार हे सुद्धा सत्याग्रहाचे मुख्य साधन होय. म. गांधीजींच्या आज्ञेनुसार भारतीय जनतेने परदेशी मालावर पूर्णपणे बहिष्कार टाकला होता. एवढेच नव्हे तर सरकारी कचेऱ्या, न्यायालये, शाळावर ही बहिष्कार टाकण्यात आला होता. बहिष्कार हा राजकीय क्षेत्राबरोबरच सामाजिक क्षेत्रात उपयुक्त ठरतो. एखाद्या व्यक्तीवर बहिष्कार टाकल्यास ती चांगल्या मार्गाचा अवलंब करते.

**5) संप** –संप हे साधन आता सर्वसामान्य साधन बनले आहे. अर्थातच सर्वच संप म. गांधीजींनी घालून दिलेल्या तत्वानुसार चालत आहेत, असे मात्र म्हणता येणार नाही. म. गांधीजी म्हणतात की, अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी कामगारांनी संपाचे हत्यार वापरावे. कामगारांनी कारखान्याच्या सर्वांगीण विकासासाठी संपाचा न्याय्य वापर केला पाहिजे. जुलूम आणि अन्याय यांच्या निवारणासाठी संपाचा अवलंब आवश्य केला पाहिजे. म. गांधीजींनी संपावर सुद्धा मर्यादा टाकल्या आहेत. ते म्हणतात की, संपात हिंसेचा थोडा ही वापर होता कामा नये. संपात कामगारांनी लाचारीची तडजोड कधी ही करू नये.

**सत्याग्रहाचे विविध आविष्कार**

**1) अन्यायाविरुद्ध प्र  तिकार** – जेव्हा एखाद्या अन्यायी कायदा लोकांच्या इच्छे विरुद्ध त्यांच्यावर लादला जातो, तेव्हा अत्याचार करून सरकारला आपल्या पुढे हार खायला लावून तो कायदा रद्द करायला लावणे आणि राज्यकर्ते अथवा कायदे करणारे यांच्या अंतःकरणातील सहानुभूतीची तार छेडली जाईपर्यंत तो कायदा मान्य करण्याचे नाकारणे, व त्याकरिता होणारी शिक्षा सहन करणे, अशा रीतीने आपले सर्व आत्मबळ एकवटून अन्यायाचा प्रतिकार करणे होय.

**2) सामूहिक कायदेभंग**– सामूहिक कायदेभंग हा देखील सत्याग्रहाचाच प्रकार आहे. मोठ्याा प्रमाणावर केंद्र ओढवून घेऊन स्वतः पोलिसांच्या स्वाधीन होणे हीच स्थिती सरकार विरुद्ध बंडाची असते. पण यात सर्व गोष्टीची पूर्ण कल्पना सत्याग्रहांना असली पाहिजे. सामुदायिक कायदेभंगाचे शस्त्र हाताळतांना नेत्याच्या अंगी अतिशय कौशल्य लागते. या प्रकारच्या सत्याग्रहात सविनय हा शब्दाला विशेष महत्त्व आहे. हा लढा फक्त अहिंसकच असू शकतो. यात संप, व विध्वंसक असहकार त्याचा समावेश होत नाही.

**3) करबंदी** – करबंदी असहकाराची अंतिम पायरी आहे. अन्यायी कर अमान्य करणे ही विशेष अधिकाराची बाब आहे. स्वार्थापोटी लोक या चळवळीत सामील होण्याची शक्यता असते. जो पर्यंत सत्याग्रही जीवन पद्धतीचे शिक्षण लोकांना दिले गेले नाही. तोपर्यंत ही चळवळ अंमलात आणू नये. या सर्व गोष्टींचा उपयोग राजकारणात योग्य ठिकाणी करणे अनैतिक होत नाही.

**सत्याग्रहाची वैशिष्ट्यो**

**1) नैतिक अधिष्ठान** –महात्मा गांधीजींनी सत्याग्रह कल्पनेला नैतिक अधिष्ठान दिले, आणि अध्यात्मिक आधार दिला. भारताच्या त्या वेळच्या परिस्थितीत हीच एकमेव कल्पना होती असे म्हणता येईल. मा. गांधीजींनी केवळ स्वदेशाच्या संदर्भात नव्हे तर परदेशाचे आक्रमण झाले असता सत्याग्रह कसा करावा, याचे नैतिक दृष्टिकोनातून विवेचन केले आहे. आक्रमकांनी आपल्या भूमीवर कब्जा केल्यानंतर त्यास अजिबात सहकार्य द्यावयाचे नाही. ही म. गांधीजींची त्या संदर्भातील भूमिका होती. लोकांचे सहकार्य जर अजिबात नसेल तर सत्ता टिकवून ठेवणे फार कठीण जाईल.

**2) अहिंसेचा पुरस्कार** – महात्मा गांधीजींच्या मते, सत्याग्रहात अहिंसेला एक नैतिक मूल्य म्हणून फार महत्त्वाचे स्थान आहे. म. गांधीजींचा विश्वास होता की, आक्रमक कितीही क्रूर असला तरी त्याला शुद्ध अंतकरण असते. त्याच्यात अनुकंपा, सहानुभूती या भावना निर्माण होऊ शकतात.

**3) सत्यावर उभारणी** – हा म. गांधीजींचा विचार पूर्णपणे नैतिक मूल्यावर आधारित आहे, व सत्य हा त्याचा आधार आहे ही कल्पनाच मुळी अध्यात्मिक स्वरूपाची आहे. अहिंसा आणि सत्यावर त्याची उभारणी झाली आहे. म. गांधीजी म्हणतात की, जे उद्दिष्ट आपल्याला साध्य करावयाचे आहे ते शुद्ध, स्वच्छ असले पाहिजे त्याचबरोबर ते साध्य करण्यासाठी आपण जे मार्ग वापरतो ते ही शुद्ध स्वरूपाचे असले पाहिजेत. साधने अशुद्ध आणि स्वार्थाने भरलेली असतील तर सत्याग्रहा मधील हेतू विफल होतो आणि सत्याग्रहींचा पूर्ण पराभवही होऊ शकतो.

**सत्याग्रहाचे लोकशाहीतील स्थान** – व्यक्ति स्वातंत्र्य व सामाजिक न्याय ही लोकशाहीची दोन प्रमुख लक्षणे आहेत, व्यक्तीला तिच्या

इच्छेप्रमाणे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. हा हक्क जर कोणी नाकारीत असेल किंवा त्यावर आक्रमण करीत असेल, तर त्या व्यक्तीला न्यायालयाकडे दाद मागण्याचा अधिकार असला पाहिजे. तसा जर अधिकार नसेल तर, अशा तऱ्हेने आपले न्याय्य हक्क प्रस्थापित करण्याची मोकळीक नागरिकांना नसेल तर त्या अन्यायाच्या विरुद्ध सामान्याला उभे राहणे, हे सत्याग्रही सैनिकाचे कर्तव्य ठरते. त्याचप्रमाणे विकास योजना आखतांना समाजातील सर्व थरांना योग्य प्रमाणात त्याचा फायदा मिळाला पाहिजे, व सर्वांना समान संधी देण्याची जबाबदारी सरकारने स्वीकारली पाहिजे. तेथे जाती, धर्म, वंश, वर्ग इत्यादी किंवा इतर कोणत्याही कारणाने त्यांच्यात भेदभाव असता कामा नये. तसा जर कोठे दिसून आला तर त्या पक्षपाता विरुद्ध सत्याग्रही कार्यकर्त्याने आवाज उठविला पाहिजे.

**सारांश** – भारताच्या स्वातंत्र्याच्या चळवळीला गती देण्याचे काम म. गांधीजींनी केले. सत्याग्रहामुळे लोकशिक्षणाला चालना मिळाली. ब्रिटिश राज्यकर्त्यांना सशस्त्र प्रतिकाराचा परिचय होता. परंतु सत्याग्रहाचा अहिंसक मार्ग नाविन्यपूर्ण होता. म.गांधीजींचा मार्ग कोणत्याही अन्यायाला प्रतिकार करण्याचा असल्यामुळे व्यापक स्वरूपाचा आहे. तो एखाद्या देशापूरता मर्यादित नाही. म. गांधीजींचा विचार हा केवळ राजकीय क्षेत्रापुरता मर्यादित नाही. तर त्यांनी व्यक्तीच्या आणि समाजाच्या समग्र जीवनाचा विचार केलेला आहे. राजकीय, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक प्रश्न लक्षात घेऊन त्यावर उपाय महात्मा गांधींनी सुचविले आहेत.

***संदर्भसूची*** –


*1) पाटील वा. भा., 'आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत', प्रशांत पब्लिकशन, जळगाव, 2013*

*2) भिसे आर. एम., 'वर्तमान परिस्थितीत महात्मा गांधीजींच्या विचारांची आवश्यकता', प्रशांत पब्लिकेषन, जळगाव, ऑक्टोबर, 2012*

*3) पवार एस. डी. 'सत्याग्रही समाजवाद : गांधीवाद व मार्क्सवादाचा समन्वय', डायमंड पब्लिकेषन, पुणे, जुलै, 2016*

*4) कुमार एम., शर्मा दिप्ती, 'महात्मा गांधी', अर्जुन पब्लिशिंग हाऊस, दिल्ली, 2016*

*5) मिश्रा एम. के., दाधीच कमल, 'गॉधी और सत्याग्रह', अर्जुन पब्लिशिंग हाऊस, दिल्ली, 2017*

*6) विकिपीडिया*